# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला (महाराष्ट्र)

विद्यापिठाचे संकेतस्थळ – **http://www.pdkv.ac.in**

## माळी प्रशिक्षण अभ्यासक्रम
## (निम्न कृषि शिक्षण शाखा)

## प्रवेश माहिती पुस्तिका
## २०२१–२०२२

किंमत रु. ५०/– फक्त

## विद्यापीठाचे संबंधीत अधिकारी

| अ.क्र. | पद | नांव | कार्यालय दुरध्वनी क्र. |
|---|---|---|---|
| १. | कुलगुरु | डॉ. व्हि. एम. भाले | (०७२४) २२५८३६५ |
| २. | संचालक (शिक्षण) | डॉ. एम. बी. नागदेवे | (०७२४) २२५८०९३ |
| ३. | अधिष्ठाता (निम्न कृषि शिक्षण विद्याशाखा) | डॉ. बी. व्ही. सावजी | (०७२४) २२५८७०६ |
| ४. | सहयोगी अधिष्ठाता (निम्न कृषि शिक्षण विद्याशाखा) | डॉ. बी. व्ही. सावजी | (०७२४) २२५८७०६ |
| ५. | सहयोगी अधिष्ठाता (शिक्षण) | डॉ. बी. व्ही. सावजी | (०७२४) २२५८५५० |
| ७. | सहयोगी अधिष्ठाता, उद्यानविद्या महाविद्यालय, अकोला | डॉ. पि. के. नागरे | (०७२४) २२५८५०८ |
| ८. | प्रभारी अधिकारी, माळी प्रशिक्षण केंद्र, उद्यानविद्या महाविद्यालय, अकोला | डॉ. एम. एस देशमुख | ८८३०४६६४९० |
| ९. | प्रभारी अधिकारी, माळी प्रशिक्षण केंद्र, कृषि महाविद्यालय, नागपूर | डॉ. एस.ए.ठाकरे | ९७३०२५०३८४ |
| १०. | प्रभारी अधिकारी, माळी प्रशिक्षण केंद्र, प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, काटोल | डॉ. एच.बी.गोरमनगर | ९८२२५३४५५५ |
| ११. | प्रभारी अधिकारी, माळी प्रशिक्षण केंद्र,कृषि संशोधन केंद्र, अचलपुर | डॉ. वाय.डी.चर्जन | (०७२२३) २२०११९ |
| १२. | कुलसचिव | डॉ. एस. आर. काळबांडे | (०७२४) २२५८३७२ |
| १३. | उपकुलसचिव (वि.वि.) | डॉ. जी. यु. सातपुते | (०७२४) २२५९२४८ |

प्रकाशक :

कुलसचिव
डॉ. पं. दे. कृ. वि.
कृषिनगर अकोला–४४४१०४.

# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

## माळी प्रशिक्षण अभ्यासक्रम

### प्रवेश माहीती पुस्तीका २०२१–२०२२

**१. प्रवेशासंबंधी महत्वाच्या सुचना :**

अ) माळी प्रशिक्षण हा एक वर्ष कालावधीचा अभ्यासक्रम आहे.

ब) प्रशिक्षणाचे व परीक्षेचे माध्यम मराठी राहील.

क) **प्रभारी अधिकारी, माळी प्रशिक्षण केंद्र, कृषि महाविद्यालय, नागपूर** येथे २५ जागा विद्यावेतनाच्या व ७५ जागा विना विद्यावेतनाच्या(नागपूर, वर्धा, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली व गोंदीया जिल्हयातील रहिवाश्यांसाठी) राहतील व **माळी प्रशिक्षण केंद्र, उद्यानविद्या महाविद्यालय, अकोला** येथे २५ जागा विद्यावेतनाच्या व ७५ जागा विना विद्यावेतनाच्या (अकोला, बुलढाणा अमरावती, वाशिम, यवतमाळ जिल्हयातील रहिवाश्यांसाठी) राहतील.

ड) **प्रभारी अधिकारी, माळी प्रशिक्षण केंद्र, प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, काटोल** व **प्रभारी अधिकारी, माळी प्रशिक्षण केंद्र, कृषि संशोधन केंद्र, अचलपुर** येथे ५० जागा विनाअनुदानित तत्वावर राहतील.

ई) माळी प्रशिक्षण अभ्यासक्रमाचा अर्ज व माहीती पुस्तीका डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांच्या **www.pdkv.ac.in** या संकेतस्थळावरून (वेबसाईट) डाऊनलोड करावे.

**२. प्रशिक्षणाचा उद्येश :**

अ) फळझाडे, भाजीपाला व फुलझाडे यांच्या लागवडी पध्दती आणि त्यावर रोग/किडींचा बंदोबस्त या संबंधीचे विस्तृत व प्रात्याक्षीकाभिमुख शिक्षण देणे.

ब) प्रशिक्षणार्थ्यामध्ये रोपवाटीकेची व्यवस्था, बागायती कामे व शास्त्रीय अभिवृध्दी बाबतचे कौशल्य वृद्धींगत करणे.

क) बागायत शास्त्रात मध्यस्तर कार्य करणा–या तंत्रज्ञांची गरज भागविणे.

ड) ग्रामीण युवकांमध्ये बागायती व्यवसायात आत्मविश्वास निर्माण करणे.

**3. प्रवेशाची पात्रता :**

अ) इयत्ता 9 वी उत्तीर्ण उमेदवार प्रवेशाकरीता अर्ज करण्यास पात्र ठरेल आणि इयत्ता 9 वी च्या गुणपत्रिकेत नमुद केलेले गुण विचारात घेतले जातील. नविन शिक्षण प्रणालीनुसार गुणाऐवजी श्रेणी दिली असल्यास, दोन्ही सत्रातील श्रेणी, अ–1 = 95 %, अ–2 = 85 %, ब–1 = 75 %, ब–2 = 65 %, क–1 = 55 %, क–2 = 45 % आणि ड = 35 % अशाप्रकारे श्रेणीचे रुपांतर गुणांत करुन गुणवत्ता यादी लावण्यात येईल. ई–1 किंवा ई–2 श्रेणी कुठल्याही एका विषयात जरी असली तरी तो उमेदवार प्रवेशाकरीता अपात्र ठरविण्यात येईल. या व्यतिरिक्त श्रेणीची पद्धत वेगळी अवलंबविण्यात आली असल्यास त्यांचे गुणांत रुपांतर करण्याकरीता नवीन सुत्र तयार करण्यात येईल. तेंव्हा इयत्ता 9 वी ची गुणपत्रिका/प्रगतीपत्रक अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

ब) उमेदवाराचे वय दिनांक 1 जुलै 2021 रोजी 14 वर्षापेक्षा कमी व 30 वर्षापेक्षा जास्त नसावे

क) निवड झाल्यावर प्रवेश घेतांना प्रत्येक प्रशिक्षणार्थ्याला ठराविक नमुन्यातील वैद्यकीय प्रमाणपत्र (प्रमाणित वैद्यकीय अधिकाऱ्याकडून) एका महिन्याचे आत द्यावे लागेल. ते न दिल्यास अथवा दिलेले प्रमाणपत्र असमाधनकारक असल्यास प्रवेश रद्द केल्या जाईल

ड) उमेदवाराची श्रम करण्याची तयारी असावी.

ई) **प्रवेश अर्ज शुल्क** – उमेदवारांसाठी **रु. ५०/(रुपये पन्नास फक्त)** सदरचे शुल्क ना परतावा आहे. सदरचे शुल्क उमेदवारला ज्या माळी प्रशिक्षण केंद्राकडे अर्ज सादर करावयाचा आहे त्या संबधित केंद्राच्या

खालील प्रमाणे निर्देशित केलेल्या अधिकाऱ्याच्या नावे धनाकर्ष काढून किंवा आर.टी.जी.एस. (RTGS) **ने निर्देशित केलेल्या बँकेच्या खात्यावर पाठवून प्रवेश शुल्क भरल्याची पावती प्रवेश यांचे खात्यावर आर.टी.जी एस.ने पाठवून प्रवेश शुल्क भरल्याची पावती प्रवेश अर्जासोबत स्कॅनीग करून जोडावी.**

| अ. क. | माळी प्रशिक्षण केंद्राचे नांव | ई.मेल | राष्ट्रीयकृत बँक खाते नांव | राष्ट्रीयकृत बँक खाते कमांक व IFSC कोड |
|---|---|---|---|---|
| 1 | माळी प्रशिक्षण केंद्, उद्यान विद्या महाविद्यालय, अकोला | headfloriculture@gmail.com | नियत्रंक, डॉ.पंदेकृवि, अकोला | 10428432624<br>SBIN00002171<br>स्टेट बँक ऑफ इंडिया,अकोला |
| 2 | माळी प्रशिक्षण केंद्र, कृषि महाविद्यालय, नागपुर | seemaat2015@gmail.com | नियत्रंक, डॉ.पंदेकृवि, अकोला | 11072618308<br>SBIN0001633<br>स्टेट बँक ऑफ इंडिया, नागपुर |
| 3 | माळी प्रशिक्षण केंद्, प्रादेशिक फळ संशोधन केंद्र काटोल जि.नागपुर | rfrs@radiffmail.com | नियत्रंक, डॉ.पंदेकृवि, अकोला | 11335805095<br>SBIN0000563<br>स्टेट बँक ऑफ इंडिया, काटोल |
| 4 | माळी प्रशिक्षण केंद्र, कृषि संशोधन केंद्र अचलपुर जि. अमरावती | arsachalpur@pdkv.ac.in | अधिदान व लेखाधिकारी, डॉ.पंदेकृवि, अकोला | 11373766285<br>SBIN0000371<br>स्टेट बँक ऑफ इंडिया,अचलपुर |

फ) माहिती पत्रकामधील निर्देशीत केलेले कागदपत्रे अर्जासोबत जोडावे.

ग) ज्या उमेदवारांना ऑनलाइन अर्ज करणे शक्य नसेल, त्या उमेदवारांनी www.pdkv.ac.in या संकेतस्थळावरून (वेबसाइट) महितीपत्रक व प्रवेश अर्ज डाउनलोड करून सदर अर्ज पूर्ण भरुन आवश्यक ते कागदपत्रे प्रमाणित (Attested) करुन अर्ज शुल्काचे धनाकर्ष ४ (ई) मधील संबंधित प्रशिक्षण केंद्राच्या निर्देशित केललेल्या यांचे नावे काढून किंवा आर.टी.जी.एस. (RTGS) ने भरलेल्या शुल्काची पावती जोडुन संबंधित माळी प्रशिक्षण केंद्रास व्यक्तिश: पोहचवुन देवुन पोच पावती घेता येईल किंवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठविता येईल. मात्र शेवटच्या तारखेपर्यंत अर्ज प्राप्त न झाल्यास अर्ज ग्राह्य धरता येणार नाही, याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

ह) स्कॅन करून ईमेल व्दारे सादर केलेली कागदपत्रे वाचनीय असावीत याची खातरजमा करून कागदपत्रे संबंधित माळी प्रशिक्षण केंद्रास सादर करावीत. सादर केलेली कागदपत्रे वाचनीय नसल्यास ते ग्राहय धरण्यात येणार नाहीत व त्याची जबाबदारी पूर्णतः उमेदवाराची असेल.

ज) प्रवेश अर्जासोबत संपुर्ण कागदपत्रे न जोडल्यास, अर्ज शुल्क न भरल्यास अथवा अर्ज शुल्क भरल्याची पावती अर्जासोबत न जोडलेले प्रवेश अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.

ल) प्रवेश अर्जाची प्रत किंवा इतर कोणतीही कागदपत्रे टपालाने / कुरीअरने किंवा हातबटवडयाने सहयोगी अधिष्ठाता, नि.कृ.शि.यांचे कार्यालय, किंवा कृषी विद्यापीठ अकोला येथे कागदपत्र पोष्टाव्दारे पाठवु नयेत. अश्या प्राप्त अर्जांना ग्राहय धरल्या जाणार नाही.

**४. उमेदवाराची निवड :**

अ) उमेदवाराची निवड गुणवत्तेनुसार व वर्गवारीनुसार करण्यात येईल. गुणवत्तेचे मापन खालील पध्दतीनुसार केले जाईल.

१) ९ वी इयत्तेच्या गुणपत्रकानुसार/प्रगतीपुस्तकावरील श्रेणीचे गुणांत रुपांतर केल्यानंतर शेकडा मिळालेले गुण (टक्के)

२) शेतकरी/शेतमजूर यांचा पाल्य असल्या संबंधीचे प्रमाणपत्र (७/१२ खसरा उतारा सन २०२०–२०२१ किंवा २०२१–२०२२ या वर्षाचा) : १२ टक्के गुण (वरील अ–१ अ–२ यांची बेरीज गुणवत्ता टक्केवारी म्हणून समजण्यात येईल)

ब) प्रवेश मिळण्याकरीता अर्ज करणा–यास प्रत्यक्ष मुलाखतीस हजर राहावे लागणार नाही.

क) उमेदवाराची निवड विहीत केलेल्या राखीव जागा लक्षात घेउन गुणवत्तेवर ठरविलेल्या नियमानुसार केली जाईल.

ड) तात्पुरती गुणवत्ता यादी व रद्द अर्जाची यादी संबंधीत माळी प्रशिक्षण केंद्राच्या सुचना फलकावर दि. ०४.०८.२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजता लावण्यात येईल.

ई) ज्या विद्यार्थ्यांची नावे निवड यादीत आहेत, त्यांना आवश्यक ती फी व अनामत रक्कम संबंधीत माळी प्रशिक्षणाच्या कार्यालयात दि. १८.०८.२०२१ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी २.०० वाजेपर्यंत भरावी लागेल. या कालावधीत निवड झालेल्या यादीतील जे उमेदवार पैसे भरणार नाहीत, त्यांचा प्रवेश रद्द समजण्यात येईल. अशा प्रकारच्या ज्या जागा रिकाम्या राहतील, त्या जांगासाठी प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना प्रवेश गुणवत्तेनुसार व वर्गवारीनुसार देण्यात येईल

फ) प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना प्रवेश हवा असेल तर दि. २४.०८.२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून दुपारी २.०० वाजेपर्यंत संबंधीत माळी प्रशिक्षण केंद्राच्या कार्यालयात स्वःखर्चाने हजर राहून व मुळ प्रमाणपत्र दाखवून प्रतिक्षा यादीवर सही करणे आवश्यक आहे. प्रतिक्षा यादीतील निवड झालेल्या उमेदवाराची दुसरी निवड यादी संबंधीत माळी प्रशिक्षण केंद्राचे सुचना फलकावर दि. २४.०८.२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत लावण्यात येईल. प्रतिक्षा यादीतील निवड झालेल्या उमेदवारास आवश्यक फी, अनामत रक्कम संबंधीत माळी प्रशिक्षण कार्यालयात दि. २४.०८. २०२१ रोजी सांयकाळी ५.०० वाजेपर्यंत भरावी लागेल.

ग) वरील अभ्यासक्रमाविषयी इतर माहीती माळी प्रशिक्षण केंद्रातून मिळू शकेल.

ह) प्रवेश घेण्यासाठी अर्जदाराने ठरलेल्या वेळेच्या आत संबंधीत संस्थेत उपस्थित राहणे आवश्यक आहे. उशिरा आल्यास प्रवेश मिळणार नाही व उशिरा येण्याबाबतच्या कोणत्याही सबबीचा /कारणांचा विचार केला जाणार नाही. (उदा. पाउस होता, पूर होता, बस उशिरा आली, बस वेळेवर मिळाली नाही, आजारी होतो, पैशाची सोय नव्हती,यादी केंव्हा लागणार हे माहीत नव्हते इ.) तसेच याबाबत कोणतीही तक्रार स्विकारली जाणार नाही व पत्रव्यवहारही केला जाणार नाही.

ज) मात्र कोविड-१९ च्या अनुषंगाने आपत्कालीन परिस्थिति वेळेवर निर्माण झाल्यास अ. क्रं.४ **ह)** मध्ये शिथिलता देण्याचे अधिकार सहयोगी अधिष्ठाता, नि.कृ.शि., डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांना राहील.

**५. प्रवेशाबाबत राखीव जागांचा तपशिल :**

उमेदवाराची निवड विहीत केलेल्या राखीव जागा लक्षात घेऊन गुणवत्ता, वर्गवारी व शासन निर्णय क. टिईएएम/१५९४/(६३२३)/ तांत्रिक शिक्षण–१ दिनांक ३ जून १९९४ तसेच शासन निर्णय क्र. CBC/1094/PK/86/MAVAK9 दिनांक १६.६.९४ अन्वये ठरविलेल्या नियमानुसार केली जाईल, तसेच शासन क्र. AGU-2195/CR-73/19-A दिंनाक ३.१.२००१ नुसार निम्न कृषि शिक्षणाअंतर्गत येणा–या विविध अभ्यासक्रमाच्या (पदविपूर्व) प्रवेशासाठी खाली दर्शविलेल्या प्रत्येक प्रवर्गात ३० टक्के जागा विद्यार्थीनीसाठी आरक्षित असून त्यावर गुणानुक्रमे प्रवेश देण्यात येईल.

**संवैधानिक आरक्षण :**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | अनुसुचित जाती (बौध्द धर्म स्विकारलेल्या व्यक्तिसह) | :– | १३ टक्के |
| २) | अनुसुचित जमाती | :– | ७ टक्के |

| | | |
|---|---|---|
| ३) विमुक्त जाती (अ) (१४ तत्सम जाती) | :– | ३ टक्के |
| ४) भटक्या जाती (ब) (जानेवारी १९९० पूर्वीच्या २८ व तत्सम जाती) | :– | २.५ टक्के |
| ५) भटक्या जमाती (क) (धनगर व व तत्सम जमाती) | :– | ३.५ टक्के |
| ६) भटक्या जमाती (ड) (बंजारी व व तत्सम जमाती) | :– | २ टक्के |
| ७) इतर मागासवर्गीय | :– | १९ टक्के |
| ८) आर्थिक दुर्बल घटक (इडब्ल्युएस) | :– | १० टक्के |

**इतर आरक्षण :**

| | | |
|---|---|---|
| ९) शेतकरी / भुमिहिन शेतमजूरांची मुले | :– | ६ टक्के |
| १०) आजी व माजी सैनिकांची मुले | :– | २ टक्के |
| ११) प्रकल्पग्रस्तांची मुले | :– | ४ टक्के |
| १२) स्वातंत्र्य सैनिकांची मुले | :– | २ टक्के |
| १३) अपंग | :– | ३ टक्के |
| १४) महिला | :– | ३० टक्के |
| १५) अनाथ | :– | १ टक्के |

* महाराष्ट्र शासन, कृषि पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण 1514 / प्र.अ.100 / 7 अे दि.08 जुलै, 2019 अन्वये अ.क्र.11,12 व 13 मध्ये नमुद केलेले आरक्षण लागू करण्यात आलेले आहे.

**टिप :–**

अ) इतर मागासवर्गिय जाती (OBC), विमुक्त जाती–(अ) (VJ/DT-A), भटक्या जमाती–(ब) (NT-B), भटक्या जमाती–(क) (NT-C), भटक्या जमाती–(ड) (NT-D) व विशेष मागासवर्गीय (SBC) ह्या वर्गवारीसाठी उन्नत / प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र (नॉन–क्रिमीलेअर) जोडणे आवश्यक आहे. उन्नत / प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र (नॉन–क्रिमीलेअर) **१ एप्रिल २०२१** नंतरचे असावे.

अनुसूचीत जाती (SC) व जमाती (ST) सोडून इतर सर्व आरक्षित प्रवर्गासाठी नॉन–क्रिमीलेअर (non-creamylayer) प्रमाणपत्र आवश्यक आहे.

शासन निर्णय क्र. बीसीसी १०९१ / २५५१ / (क) १६ ब, दिनांक २६ मार्च १९९१ अन्वये अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती व विमुक्त जाती व भटक्या जमाती परिच्छेद क्र. ५ (१) ते (६) प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध नसल्यास, ही पदे अदलाबदलीने भरण्यात येतील.

जर उमेदवार एका पेक्षा जास्त राखीव प्रवर्गात हक्क सांगत असेल, तर त्याची राखीव जागेची वर्गवारी क्रमवार (Sequence) विचारात घेण्यात येतील.

आरक्षणाबाबतचे वरील नियम, महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार केलेले बदल व सुधारणा विचारात घेउन लागू करण्यात येतील.

परिच्छेद क्र. ५ इतर आरक्षण (१०) ते (१६) मधील वर्गवारीच्या उमेदवाराची टक्केवारी ही गुणवत्ता यादीतील उमेदवारास जमेस धरुन राहील.

परिच्छेद क्र. ५ (१०) मधील शेतकरी म्हणजे ज्याची स्वतःची / कुळाची शेती असून ज्यांचे उत्पन्नाचे मुख्य साधन फक्त शेतीच आहे. तसेच शेतमजूरी करणारे म्हणजे ज्यांचे उत्पन्नाचे मुख्य साधन मजुरी आहे अशी व्यक्ती,

त्यासाठी सक्षम अधिका–याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

परिच्छेद क्र.५(११) मधील आजी–माजी सैनिक प्रवर्गातील आरक्षणासाठी उमेदवाराने पालकाचे संबंधीत खात्याचे नोकरीत असल्याबाबतचे प्रमाणपत्र किंवा Discharge Certificate ची प्रत अर्जासोबत जोडावी.

परिच्छेद क्र. ५ (१२) नुसार प्रकल्पग्रस्त प्रवर्गातील आरक्षणासाठी उमेदवाराने पुर्नवसन अधिकारी यांचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील. या सवलतीचा फायदा मिळण्याकरीता त्यात विद्यार्थ्यांच्या नावाचा उल्लेख असणे आवश्यक आहे.

परिच्छेद क्र. ५ (१३) मधील स्वातंत्र्य सैनिकांसाठी असलेल्या आरक्षण सवलतीचा लाभ स्वातंत्र्य सैनिकाचा मुलगा/मुलगी किंवा मुलाचा/मुलीचा मुलगा/मुलगी यांना खालील अटींच्या अधिन राहून दिला जाईल. उमेदवाराचे आई/वडील किंवा आजी/आजोबा स्वातंत्र्य सैनिक असल्याबाबतचे मा. मुख्यमंत्र्यांच्या सहीचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. स्वातंत्र्य सैनिक यांचे खालील मुद्यांवरील रू. १००/– चे स्टॅपपेपरवर प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल **(या शपतपत्रात स्वातंत्र्य सैनिकाने उमेदवाराशी असलेले स्वतःचे नाते उमेदवाराच्या नामनिर्देशासह स्पष्टपणे नमूद केलेले असावे).**

१. उमेदवार हा स्वातंत्र्य सैनिकाच्या मुलाचा/मुलीचा, मुलगा/मुलगी आहे.

२. स्वातंत्र्य सैनिकाने ह्या सवलतीचा उपयोग यापूर्वी कुठल्याही नातेवाईकासाठी केलेला नाही.

३. स्वातंत्र्य सैनिकाने ह्या सवलतीचा उपयोग आता केला तर, यापुढे कुठल्याही नातेवाईकासाठी करणार नाही.

परिच्छेद क्र. ५ (१४) मधील अपंग प्रवर्गातील आरक्षणासाठी उमेदवाराचे ४० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याबाबतचे जिल्हा शल्यचिकित्सक/वैद्यकीय मंडळाचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

परिच्छेद क्र. ५ (१५) मधील महिला प्रवर्ग आरक्षण शासन निर्णय क्र. अेजीयु–२१९५/सीआर–७३/१९–अे दिनांक ३ जानेवारी २००१ नुसार एकुण जागांच्या तीस टक्के जागा महिला उमेदवारांसाठी आरक्षित आहेत. प्रत्येक उमेदवाराच्या अर्जाचा सर्वप्रथम विचार त्यांच्या गुणवत्तेवर (On Merit) केल्या जाईल.

प्रवेश अर्जासोबत आवश्यक सुचना जोडल्या आहेत. त्यात प्रवेशाबाबतच्या विविध तारखा व इतर आवश्यक माहीती दिली आहे. या तारखेप्रमाणे अर्ज केलेल्या उमेदवाराने प्रत्यक्ष संबंधीत संस्थेत स्वतः हजर राहून प्रवेश याद्या पहाव्यात उमेदवाराला निवडीबाबत पोष्टाव्दारे कळविले जाणार नाही व त्याबाबतची कोणतीही तक्रार स्विकारल्या जाणार नाही.

**६. फी व अनामत रक्कम :**

निवड झालेल्या उमेदवारांना खालील प्रमाणे किंवा वेळोवेळी विद्यापीठ ठरविल त्यानुसार अनामत रक्कम व इतर शुल्क भरावे लागेल.

| | | | |
|---|---|---|---|
| अ) शैक्षणीक शुल्क | २५०/– | ब) सफाई शुल्क | ५०/– रुपये |
| क) पाणी पटट्री | ५०/– | ड) विजेचा खर्च | १५०/– रुपये |

**७. विद्यावेतन :**

माळी प्रशिक्षण केंद्र, प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, काटोल व कृषि संशोधन केंद्र, अचलपुर येथे लागु नाहि.

**८. इतर माहिती :**

अ) विद्यापीठाने केलेले सर्व सामान्य नियम विद्यार्थ्यास बंधनकारक राहतील.

ब) निर्धारीत गणवेश विद्यार्थ्यास (नेव्ही निळा पॅन्ट आणि आकाशी निळा शर्ट) आणि विद्यार्थीनीस (आकाशी निळया रंगाची साडी/ब्लाऊज/कुर्ता/सलवार/ओढणी) वापरावा लागेल.

क) खोटे प्रमाणपत्र अथवा माहीती देउन प्रवेश प्राप्त केला आहे, असे निदर्शनास आल्यास प्रवेश रद्द करण्यात येईल.

ड) जेवणाची, राहण्याची सोय व त्याचा खर्च विद्यार्थ्यास स्वतः करावा लागेल.

ई) निम्न कृषि शिक्षण अंतर्गत विविध अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना सर्व शाळांच्या सोयीकरीता दिवाळी सणानिमित्य आठ दिवसाची सुट्टी राहील. ही सुटी दिवाळी (लक्ष्मीपूजन) चे दोन दिवस अगोदरपासून सुरु होईल.

फ) प्रशिक्षणा दरम्यान ८० % उपस्थिती असल्याशिवाय परिक्षेकरीता पात्र समजल्या जाणार नाही.

ग) कुठल्याही परिस्थितीत दुय्यम (**Duplicate**) दाखल्यावरुन प्रवेश दिल्या जाणार नाही, काही अपवादात्मक परिस्थितीत डुप्लीकेट प्रत विचारात घेतली जाईल तथापि, त्या सोबत खालील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

१. शाळा सोडल्याचा दाखला हरवला असल्यास रु. २०/– चे स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र सादर करावे.

२. मुळ दाखला हरवल्या बाबतची विभागीय वर्तमान पत्रातून प्रकाशित केलेली जाहीर प्रगटनाची प्रत सादर करावी.

३. मुळ शाळा सोडल्याचा दाखला हरविल्या बाबतची पोलीसात नोंदविलेल्या तक्रारीची प्रत सादर करावी.

म) विद्यार्थी प्रशिक्षण अर्धवट सोडून गेल्यास अथवा जे विद्यार्थी वर्गातील उपस्थितीच्या कमतरते मुळे परिक्षेस बसण्यासापासून वंचित राहतील त्यांचेकडून त्यांना अदा केलेले विद्यावेतन वसुल करण्यात येईल.

<u>माळी प्रशिक्षण अभ्यासक्रम प्रवेश वेळापत्रक</u>

**वर्ष : २०२१–२०२२**

| | | |
|---|---|---|
| १. | प्रवेश आवेदन अर्ज व माहीतीपत्रक स्विकारण्याची तारीख | १५.०७.२०२१ते ३०.०७.२०२१ |
| २. | प्रवेशाचे आवेदन अर्ज स्विकारण्याची शेवटची तारीख | ०२.०८.२०२१ |
| ३. | तात्पुरती गुणवत्ता यादी व रद्द अर्जाची यादी प्रसिध्द करणे. | ०४.०८.२०२१ |
| ४. | तात्पुरती गुणवत्ता यादी व रद्द अर्जाचे बाबत तक्रार अर्ज स्विकारणे. | ०६.०८.२०२१ |
| ५. | तक्रार निवारण समितीची सभा | १०.०८.२०२१ |
| ६. | तात्पुरती गुणवत्ता यादी, निवड व प्रतिक्षा यादी मंजूर करणे. | १२.०८.२०२१ |
| ७. | तात्पुरती निवड यादी व प्रतिक्षा यादी प्रसिध्द करणे | १३.०८.२०२१ |
| ८. | तात्पुरत्या निवड यादीतील उमेदवारांना प्रवेश देणे | १८.०८.२०२१ |
| ९. | वरील यादीतील रिक्त जागी प्रतिक्षा यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेश देणे | २४.०८.२०२१ |
| १०. | शैक्षणीक सत्राची सुरुवात | २५.०८.२०२१ |
| ११. | प्रवेश प्राप्त विद्यार्थी सोडून गेल्याने रिक्त झालेल्या जागी यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेश देणे | २७.०८.२०२१ |
| १२. | सदर जाहीरातीद्वारे प्राप्त अर्जाच्या कमतरतेमुळे काही जागा रिक्त असल्यास प्रभारी अधिकारी, माळी प्रशिक्षण केंद्र संबंधीत राजस्व विभागाच्या पात्र उमेदवारांचे परस्पर अर्ज स्विकारुन कुठल्याही आरक्षणाचे बंधन न ठेवता प्रवेश देतील | ०१.०९.२०२१ ते ०३.०९.२०२१ |